# प्रेसनोट दिनांक ११/०८/२०१९
## दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर.
## "लॅपटॉप चोरणारे गुन्हेगार दत्तवाडी पोलीसांच्या ताब्यात"
## (पोलीसगस्तीमध्ये संशयिताला पोलीसांनी पकडले)

दत्तवाडी पोलीस स्टेशन हद्दीत होणा-या घरफोडी चोरींना प्रतिबंध करण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक कुलदिप संकपाळ, पो. हवा. २५९१ जाधव, पो. ना. ५६५१ घोटकुले, पो. ना. ६७४० यादव, पो. शि. ९१८३ ओलेकर, पो. शि. ८७१० सुतकर व पो. शि. ८१३३ भोसले असे पेट्रोलिंग करीत असताना शिवदर्शन येथील महालक्ष्मी मंदीराचे समोरील मोकळया असणारे स्टेजचे भिंतीचे आडोशाला चार इसम हे एकमेकांमध्ये काहीतरी कुजबुजत संशयास्पदरित्या थांबलेले असताना व त्यांचेकडे लॅपटॉपसारख्या वस्तु असलेल्या दिसुन आल्याने त्यांचेकडे विचारपुस केली असता ते अचानकपणे तेथुन पळुन जावु लागले. त्यांना तेथेच जागीच अत्यंत शिताफीने पकडुन त्यांची नाव पत्ता विचारता त्यांनी आपली नावे १) विनोद अमर खत्री वय. २५ वर्षे, रा. अमर दर्शन सोसायटी, भाजी मंडई जवळ, लोणीकाळभोर, पुणे २) धीरज प्रेम साई वय. १९ वर्षे, रा. एस के चायनीज दुकान, अरण्येश्वर, पुणे ३) जनक अमर खत्री २० वर्षे, रा. अमर दर्शन सोसायटी, भाजी मंडई जवळ, लोणीकाळभोर, पुणे व ४) प्रथमेश ज्ञानेश्वर पवार वय. १८ वर्षे, रा. ५४/२, अण्णाभाऊ साठे वसाहत, अरण्येश्वर, पुणे. अशी सांगितली. त्यांची झडती घेतली असता त्यांचेकडे दोन लॅपटॉप मिळुन आले. हे लॅपटॉप त्यांनी मित्र मंडळ कॉलनी पर्वती पुणे येथील एका ऑफिसमधुन कडी कोयंडा तोडुन चोरले होते. वरील आरोपी याना अटक करण्यात आली आहे.

या कारवाईतपोलीस उपनिरीक्षक कुलदिप संकपाळ, पो. हवा. २५९१ जाधव, पो. ना. ५६५१ घोटकुले, पो. ना. ६७४० यादव, पो. शि. ९१८३ ओलेकर, पो. शि. ८७१० सुतकर व पो. शि. ८१३३ भोसले यांनी सहभाग घेतला आहे.

**(देविदासघेवारे)**
वरिष्ठ पोलीसनिरीक्षक
दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर.